# वार्तापत्र

पोलीस अधिक्षक कार्यालय
गडचिरोली, दिनांक ०१/०६/२०१८

## दोन सहा. फौजदार सेवानिवृत्त

दिनांक ३१/०५/२०१८ रोजी गडचिरोली पोलीस दलातुन ०२ सहा. फौजदार सेवानिवृत्त झाले. विषेश बाब म्हणजे जिल्हा स्थापनेनंतर जिल्ह्याचा पहिला पोलीस म्हणुन बहुमान मिळविलेले सहा. फौजदार सुनिल आनंदराव उराडे ब.न.१ व सहा. फौजदार हरिचंद्र कवडुजी कन्नाके हे दाघे आपली अनक्र्मे ३५ व ३३ वर्ष अविरतेपणे सेवा बजावुन सेवानिवृत्त झाले आहेत. सुनिल आनदं राव उराडे हे २९/११/१९८२ रोजी भरती होवुन दिनांक ०१/०७/१९८३ रोजी सेवेत रुजु झाले. तेव्हापासुन त्यांनी गडचिरोलीतील पुराडा, अहेरी, राजाराम खांदला, दामरंचा, एटापल्ली, जारावंडी, या दुर्गम भागात आपली सेवा बजावली तर हरिचंद्र कन्नाके हे दिनांक २०/०५/१९८५ रोजी पोलीस खात्यात रुजु झाले. त्यांनी जिमलगट्टा, चातगाव, मुरुमगाव, यासारख्या दुर्गम भागात आपली सेवा बजावली आहे. याप्रसंगी आयार्जित कायर्क्रमात बोलतांना सुनिल उराडे यांचा उर भरुन आला होता. गडचिरोाी जिल्ह्याचे पहिले पालीस अधिक्षक मा. पारधी सर ते आत्ताचे पोलीस अधिक्षक डॉ. अभिनव दशेमखु सर याच्या मागर्दर्शनाखाली अविरतेपण े कर्तव्य बजावत असतांना आपणास खुप काही शिकायला मिळाले असे सांगुन भविष्यात सेवानिवृत्तीनंतर सामाजिक क्षेत्रात काम करण्याची ईच्छा त्यांनी व्यक्त केली तर हरिचंद्र कन्नाके यांनी व्यवसाय क्षेत्रात आपण नविन इनिंग सुरु करणार असल्याचे सांगितले. मा. पोलीस अधिक्षक डॉ. अभिनव

देशमुख सर यांनी या दोन्ही सेवानिवृत्त कर्मचा-यांच्या कार्याची प्रशंसा करुन त्यांचा शाल,श्रीफळ देवुन गौरव केला.




